GOVERNMENT OF MAHARASHTRA
STATE COMMON ENTRANCE TEST CELL, MAHARASHTRA STATE, MUMBAI
8th Floor, New Excelsior Building, A.K. Nayak Road, Fort, Mumbai 400 001
Tele. No. - 022-22016157/53/59 E-Mail maharashtra.cetcell@gmail.com Website -www.mahacet.org

क्र.तंशिप्र-११२२/प्र.क्र.०२१/पुर्न परिक्षा/ नोंदणी/ मुदतवाढ/१३८५ दिनांक : २३/०८/२०२२

# महत्वाची जाहिर सुचना

## एमएचटी सीईटी २०२२ ( पीसीएम व पीसीबी ) पुर्न परिक्षा नोंदणी कालावधीस मुदतवाढ देणेबाबत

**संदर्भ :** या कार्यालयाची दिनांक २२/०८/२०२२ रोजीची सुचना क्र. No.TED-११२१/ C.R.No.०२१/ Important Notice/१३८३/२०२२

**सुचनेचा विषय :** Re-examination of Candidates who could not complete the Examination due to Technical Issues like Server failure/Network Error.

उपरोक्त संदर्भाकिंत सुचनेच्या अनुषंगाने जे उमेदवार परीक्षेदरम्यान उदभवलेल्या सर्व्हर/ नेटवर्क या तांत्रिक अडचणींमुळे परीक्षा पुर्ण करु शकले नाहीत अशा उमेदवारांचे शैक्षणिक हित लक्षात घेवून सदर उमेदवारांना दिनांक २३/०८/२०२२ रोजी रात्री १०.०० वाजेपर्यंत पुर्न परीक्षेकरीता नोंदणी करण्यासाठी ऑनलाईन पध्दतीने लिंक उपलब्ध करुन देण्यात आली होती.

त्याचप्रमाणे भंडारा,गोदिंया,गडचिरोली या जिल्हयात दिनांक १०,११,१२ व २० रोजी झालेल्या अतिवृष्टिमुळे काही उमेदवार परीक्षा केंद्रापर्यंत पोहचू शकले नाहीत व चंद्रपूर जिल्हयामध्ये दिनांक १०/०८/२०२२ रोजी झालेल्या मुसळधार पावसामुळे काही उमेदवार परीक्षा केंद्रावर पोहचू शकले नाहीत.

उमेदवारांकडून दूरध्वनीद्वारे व या कार्यालयास प्रत्यक्ष भेट देवून पुर्न परीक्षेकरीता नोंदणी करण्याचा कालावधी वाढवून मिळणेबाबत विनंती करण्यात येत आहे.

उपरोक्त नमूद केल्यानुसार तांत्रिक व नैसर्गिक आपत्तीमुळे परीक्षा पुर्ण करु न शकलेले किंवा परीक्षेला उपस्थित राहू शकले नाहीत अशा सर्व उमेदवारांचे भवितव्याचा विचार करुन व त्यांचे शैक्षणिक हित लक्षात घेवून सदर कालावधीस **दिनांक २४/०८/२०२२ रोजी सायंकाळी ०५.०० वाजेपर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे**. सदर मुदतवाढ अंतिम असून यापुढे कोणत्याही कारणास्तव मुदतवाढ देण्यात येणार नाही, याची सर्व सबंधित उमेदवारांनी नोंद घ्यावी.

**आयुक्त**
**राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष,**
**महाराष्ट्र राज्य, मुंबई**